**महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीमार्फत देण्यात येणा-या पुरस्कार व योजनांबाबतची सुधारीत नियमावली.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. हिंसाअ ७०१९ (१४) /प्र. क्र. १८८ /सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९**

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. OFL १०८०/११४९-XXIX, दिनांक ९ मार्च, १९८२
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. हिंसाअ २०१२/पुनिब/ प्र.क्र.२२९/सां.का.४, दिनांक १ मार्च, २०१३
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. हिंसाअ २०१२/पुनिब/ प्र.क्र.२२९/सां.का.४, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१३
४) सहसंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र. मराहिंसाअ/१००९-१०१०/२०१९, दिनांक १३ जून, २०१९

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये हिंदी भाषा व साहित्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीची स्थापना दिनांक ९ मार्च, १९८२ करण्यात आली. हिंदी भाषेचा जास्तीत-जास्त प्रचार व प्रसार व्हावा म्हणून हिंदी अकादमीतर्फे विविध योजना / उपक्रमांचे आयोजन केले जाते. साहित्य क्षेत्रातील भरीव कामगिरी करणा-या तसेच त्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबाबत साहित्यिकांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात यावा म्हणून हिंदी साहित्य अकादमीतर्फे पुरस्कार योजनाबाबतची नियमावली दिनांक १ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. सदर नियमावलीमध्ये गुजराती व सिंधी अकादमीची नियमावली पाहता मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून आल्या होत्या. यास्तव, दिनांक १७ मार्च, २०१९ रोजी कार्यकारी समितीच्या बैठकीत अकादमीच्या नियमावलीवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सुधारीत नियमावलीस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपर्निर्दिष्ट क्र. २ व ३ वरील शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या खालील सुधारीत नियमावलीस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**हिंदी साहित्य अकादमीची उद्दिष्टे :-**

- महाराष्ट्र राज्यामध्ये हिंदी भाषा तसेच साहित्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहन देणे.
- महाराष्ट्र राज्यात रहिवाशी असणाऱ्या साहित्यिकांना पुरस्कृत करणे.
- हिंदी भाषेच्या उन्नतीसाठी राज्यामध्ये विविध योजना/कार्यक्रमाचे आयोजन करणे.

- हिंदी अकादमीद्वारे महाराष्ट्रामध्ये रहिवाशी साहित्यिकांच्या सर्वश्रेष्ठ साहित्यिक पुस्तकांना प्रकाशनासाठी अनुदान देणे.
- महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीतर्फे राज्यात हिंदी भाषा आणि साहित्य संवर्धनासाठी आणि प्रचार व प्रसारासाठी संगोष्ठी, परिसंवाद, संम्मेलन इ. कार्यक्रमाचे आयोजन करणे.

**(अ)- पुरस्कार योजना :-**

**१) उद्दिष्ट :-** हिंदी साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या व भरीव योगदान देणाऱ्या साहित्यिकांना तसेच प्रतिवर्षी उत्कृष्ट हिंदी विधा निर्मितीकरिता लेखकांना उत्तेजन देण्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**२ ) पुरस्काराचे स्वरुप :-**

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्काराची रक्कम |
|---|---|---|
| | **अखिल भारतीय सन्मान जीवन गौरव पुरस्कार** | |
| १) | महाराष्ट्र भारती अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार | रु.१,००,०००/- |
| २) | डॉ. राम मनोहर त्रिपाठी अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार | रु.१,००,०००/- |
| | **राज्यस्तरीय सन्मान जीवन गौरव पुरस्कार** | |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय एकता पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ४) | साने गुरुजी राष्ट्रीय एकता पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ५) | पद्मश्री अनंत गोपाल शेवडे हिंदी सेवा पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ६) | डॉ.उषा मेहता हिंदी सेवा पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ७) | गजानन माधव मुक्तिबोध मराठी भाषी हिंदी लेखक पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ८) | कांतिलाल जोशी इतर हिंदी भाषी हिंदी लेखक पुरस्कार | रु.५१,०००/- |
| ९) | व्ही.शांताराम ललित कला हिंदी विशिष्ट सेवा पुरस्कार | रु.५१,०००/- |
| १०) | सुब्रमण्य भारती हिंदी सेतु विशिष्ट सेवा पुरस्कार | रु.५१,०००/- |
| | **विधा पुरस्कार** | |
| १) | संत नामदेव पुरस्कार - (काव्य क्षेत्र) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| २) | जैनेंद्र कुमार पुरस्कार - (उपन्यास क्षेत्र) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ३) | मुंशी प्रेमचंद पुरस्कार - (कहानी) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ४) | आचार्य रामचंद्र शुक्ल पुरस्कार - (निबंध) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५) | आचार्य नंददुलारे वाजपेयी पुरस्कार - (समीक्षा) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ६) | मामा वरेरकर पुरस्कार - (अनुवाद) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ७) | होमी जहांगीर भाभा पुरस्कार - (वैज्ञानिक तकनीकी) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ८) | पं.महावीर प्रसाद द्विवेदी पुरस्कार - (हिंदी भाषा संबंधी लेखन) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ९) | विष्णूदास भावे पुरस्कार - (नाटक) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| १०) | काका कालेलकर पुरस्कार - (साहित्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| ११) | बाबुराव विष्णू पराडकार पुरस्कार - (पत्रकारीता कला) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| १२) | सोहनलाल द्विवेदी पुरस्कार - (बालसाहित्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| १३) | फणीश्वरनाथ रेणू पुरस्कार - (लोकसाहित्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |
| १४) | शशिभूषण वाजपेयी हिंदी लेखक पुरस्कार (राष्ट्रभक्ती पर आधारित लेखन) | स्वर्ण-रु.३५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- |

सर्व पुरस्कार विजेत्यांना रोख रकमेसह शाल, श्रीफळ, मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात यावे. दरवर्षी २ अखिल भारतीय स्तरावरील जीवन गौरव पुरस्कार आणि ८ राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात यावेत. विधा पुरस्कार या वर्गवारीत वर नमूद एकूण १४ पुरस्कार दिले जावेत व ते प्रत्येकी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकानुसार देण्यात यावेत. त्यास स्वर्ण, रजत, कांस्य असे संबोधण्यात यावे. या व्यतिरिक्त उत्तेजनार्थ वा अन्य कोणत्याही स्वरुपाचे पुरस्कार देण्यात येऊ नयेत.

**३) पुरस्काराचे क्षेत्र-:-** हिंदी साहित्य क्षेत्रात प्रदीर्घ काळ मोलाचे योगदान देणाऱ्या व त्यासाठी आपले आयुष्य वेचलेल्या साहित्यिकांची जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात यावी. उत्कृष्ट हिंदी वाड्.मय निर्मितीसाठी साहित्यिकांना प्रोत्साहित करण्याकरीता नव्याने प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांमधून उत्कृष्ट पुस्तक लिहिणाऱ्या लेखकांना विधा पुरस्कार देण्यात यावा.

**४) पुरस्कारासाठी पात्रता :-**

**जीवन गौरव पुरस्कारासाठी :-**

१ उत्तमोत्तम साहित्याची निर्मिती करणारे लेखक/साहित्यिक.

२ हिंदी साहित्य व साहित्याशी निगडीत क्षेत्राशी कार्यतर असलेली व्यक्ती.

३ अखिल भारतीय जीवन गौरव पुरस्कारासाठी निवडलेली व्यक्ती भारतीय नागरिक असणे आवश्यक.

४ राज्यस्तरीय सन्मान जीवन गौरव पुरस्कारासाठी हिंदी साहित्यिकाची निवड करताना त्यांच महाराष्ट्रामध्ये किमान १५ वर्षे वास्तव्य असणे आवश्यक.

**विधा पुरस्कारासाठी पात्रता :-**

१ या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या साहित्यिकांचे हिंदी साहित्य क्षेत्रातील कर्तृत्व वादातीत असावे.

२ या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या साहित्यिकांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्ष वास्तव्य असावे.

**५) समिती :-**

हिंदी साहित्य अकादमीचे कामकाज पाहाण्यासाठी कार्याध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली शासनाने गठीत केलेल्या कार्यकारी समितीमार्फत अथवा सदर समितीने पुरस्कारासाठी गठीत केलेल्या उपसमितीमार्फत पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात येईल. पुरस्कारांसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन शिफारशी/अर्ज मागविण्यात येतील व जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त शिफारशी/अर्ज तसेच अकादमी समिती सदस्यांच्या शिफारशीनुसार अंतिम निर्णय घेण्यात येईल. विधा पुरस्कारासाठी प्राप्त पुस्तकांची छाननी करून निवड करण्यासाठी एक उप समिती, हिंदी साहित्य अकादमीच्या कार्यकारी समितीमार्फत गठीत करण्यात येईल.

**६) पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंबंधी नियमावली :-**

१ अखिल भारतीय सन्मान जीवन गौरव पुरस्कार हा पुरस्कार दरवर्षी दोन व्यक्तीस दिला जाईल.

२ विधा पुरस्काराच्या बाबतीत साहित्यिकास एका क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झाला असल्यास, त्या साहित्यिकास पुढील ३ वर्षे कोणत्याही विधा पुरस्कारासाठी अर्ज करता येणार नाही.

३ साहित्यिकास एकाचवेळी वेगवेगळया विधा क्षेत्रांतर्गत पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.

४ साहित्यिक स्वत: अथवा संस्थेमार्फत, प्रकाशकामार्फत किंवा मान्यवर व्यक्तीमार्फत प्राप्त झालेल्या अर्जाचा देखील पुरस्कारासाठी विचार करता येईल.

५ डी. लिट, पी. एच. डी., एम. फिल यासारख्या शिक्षणासाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शोध प्रबंध, संपादित संकलन तसेच तत्सम इतर ग्रंथाचा पुरस्कारासाठी विचार करता येणार नाही.

६ पुरस्कारासाठी राज्यस्तरीय व मान्यताप्राप्त वृत्तपत्रातून जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतील.

७ पुरस्कार प्राप्त मान्यवर त्यांचे एक कुटूंबिय तसेच पुरस्कारासाठी अकादमीद्वारे निमंत्रित प्रमुख अतिथी (जास्तीत-जास्त २) त्याचप्रमाणे हिंदी अकादमी सदस्य यांचे पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या वेळेस निवासाची व भोजनाची व्यवस्था करण्यात येईल.

८ पुरस्कार प्राप्त मान्यवर, हिंदी अकादमीचे सदस्य तसेच पुरस्कारासाठी बोलाविण्यात आलेले अतिथी यांना पुरस्कार प्रदान सोहळयाच्यावेळी कार्यक्रमस्थळी येण्यासाठी वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**<u>७) पुरस्कार योजनेचे वेळापत्रक :-</u>**

१ प्रतिवर्षी वृत्तपत्रामध्ये एप्रिल महिन्यात जाहिरात देण्यात यावी.

२ प्राप्त शिफारशी तसेच पुस्तकांची छाननी करण्याची कार्यवाही जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

३ अकादमीच्या समितीची बैठक घेऊन पुरस्कार्थीची निवड प्रक्रिया जुलै अखेरपर्यंत पूर्ण करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

४ प्रतिवर्षी दि.१४ सप्टेंबर रोजी हिंदी भाषा दिनी किंवा समिती निश्चित करेल त्या तारखेस पुरस्कार प्रदान सोहळयाचे आयोजन करण्यात यावे.

**<u>(आ) साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम :-</u>**

महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये हिंदी साहित्य, लोकसाहित्य, संस्कृती व भाषा यापैकी एक अथवा अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता येईल. प्रत्येक वर्षी ६ महसुली विभागांमध्ये प्रत्येकी १ कार्यक्रम याप्रमाणे ६ कार्यक्रम घेण्यासाठी अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये ठिकाणांची निवड करण्यात यावी व तेथे संगोष्ठी, नाटक, परिसंवाद, कविसंमेलन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. प्रत्येक कार्यक्रमासाठी रू. ३.०० लाख इतक्या मर्यादेत खर्च करण्यात यावा. या प्रयोजनासाठी एकूण रू. १८.०० लाख इतका खर्च करण्यात यावा. अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नावे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. शासन मंजूरी नंतर एकूण खर्चाच्या मर्यादेत बाबवार बाबींमध्ये बदल करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना असतील.

**<u>(इ) पुस्तक प्रकाशनाकरीता अनुदान योजना :-</u>**

**१) <u>उद्दिष्ट :-</u>** हिंदी भाषेतील साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना सर्जनशील वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सदर योजना सुरु करण्यात येत आहे.

**२) <u>योजनेचे स्वरुप :-</u>**

१ प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन साहित्यकृती मागविण्यात याव्यात.

२ साहित्यिकांनी अकादमीकडे संपूर्ण तपशिलवार आवेदन पत्रासह साहित्यकृतीच्या सुवाच्च अक्षरातील २ हस्तलिखित प्रती द्याव्यात.

३ साहित्यिकांनी आवेदनपत्रासोबत सदर पुस्तकाच्या प्रकाशनास येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक जोडणे आवश्यक आहे.

४ सदर साहित्यकृतींची छाननी अकादमीमार्फत गठीत करण्यात आलेल्या उपसमित्यांमार्फत करण्यात यावी. समितीद्वारे छाननी सर्वसाधारणपणे प्रत्येक आर्थिक वर्षी जून/जुलै या महिन्यात करण्यात यावी.

५ साहित्यकृती अनुदानासाठी पात्र ठरल्यानंतर सदर साहित्यकृतीच्या प्रकाशनाची व्यवस्था लेखकास स्वत: करावी लागेल अथवा प्रकाशक संस्थेकडून करुन घेण्यात यावी.

६ साहित्यकृतीच्या प्रकाशनाला अनुदान दिल्यानंतर अनुदान मंजुरीच्या पत्रात प्रकाशनासाठी नमूद केलेल्या कालमर्यादेतच सदर पुस्तक प्रकाशित करणे आवश्यक असेल.

७ साहित्यकृती प्रकाशित झाल्यानंतर त्याच्या २५ प्रती विनामुल्य अकादमीस देणे बंधनकारक राहिल.

८ साहित्यकृतीचे प्रकाशन करताना त्याच्या पहिल्या पानावर खालील मजकूर हिंदी भाषेत प्रकाशित करणे आवश्यक आहे.
" हे पुस्तक महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या पुस्तक प्रकाशन अनुदान योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाच्या सहयोगातुन प्रकाशित करण्यात येत आहे."

९ एखाद्या साहित्यिकाच्या/ लेखकाच्या साहित्यकृतीस एकदा अनुदान दिल्यानंतर पुढील ५ वर्षे त्या लेखकास प्रकाशनासाठी अनुदान देता येणार नाही.

१० आवेदन पत्रातील माहिती खोटी असल्यास किंवा योजनेच्या अटी/शर्तींचा भंग झाल्याचे आढळल्यास मंजूर केलेले अनुदान रद्द करण्यात येईल, आणि जर अनुदान दिले असेल तर ते व्याजासहित परत घेतले जाईल. तसेच, आवश्यकता भासल्यास कायदेशीर उपाय - योजना केली जाईल.

११ या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.

**३) अनुदानाचे स्वरुप :-** ज्या साहित्यकृती समितीमार्फत प्रकाशित करण्यासाठी पात्र ठरविण्यात येतील, त्या साहित्यकृतींच्या प्रकाशनासाठी साहित्यिकांनी अंदाजपत्रकातील खर्चाची ५०% रक्कम अथवा रु.२०,०००/- ते रू. २५,०००/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल.

**४) योजनेसाठीची पात्रता :-**

१ महाराष्ट्रात १५ वर्षे सलग वास्तव्य करणारे हिंदी साहित्यिक (१५ वर्षाचा वास्तव्याचा पुरावा सादर करणे आवश्यक)

२ महाराष्ट्रात १५ वर्षापेक्षा अधिक काळ वास्तव्य असलेल्या स्थानिक लेखकाच्या अप्रकाशित किंवा प्रकाशनाधीन पुस्तकाच्या प्रकाशनाकरिता एका वर्षात केवळ एका पुस्तकास अनुदान देण्यात येईल.

३ शासनाच्या या योजनेअंतर्गत एकदा लाभ घेतलेल्या साहित्यिकास त्यापुढील ५ वर्षापर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

४ या योजनेअंतर्गत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाला कोणत्याही खाजगी संस्था, राज्य शासन अथवा केंद्र शासनाचे कोणतेही अनुदान घेता येणार नाही.

५ सदर अनुदान हे मूळ साहित्यकृतीलाच मिळेल. अनुदानित किंवा संपादित पुस्तकाच्या प्रकाशनास हे अनुदान मिळणार नाही.

६ साहित्यकृतीच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनासच अनुदान मिळेल. पुनर्मुद्रण अथवा नंतरच्या आवृत्तीच्या प्रकाशनासाठी हे अनुदान मिळणार नाही.

७ साहित्य क्षेत्रातील पुढील वाड्.मय प्रकार या योजनेअंतर्गत पात्र राहतील-कविता, नवलकथा, लघुकथा, नाट्य/एकांकिका, ललित, बालसाहित्य आणि इतर साहित्यिक प्रकार.

**<u>५) समिती :-</u>** प्राप्त साहित्यकृतींना अनुदान देण्यासंदर्भात पात्र ठरविण्यासाठी अकादमीमार्फत तज्ञ व्यक्तींची एक समिती गठीत करण्यात येईल. सदर समितीमार्फत साहित्यकृतींची छाननी करुन अनुदान देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल. साहित्यकृतींच्या प्रकाशनासाठी पात्र/ अपात्रतेसंदर्भात समिती घेतलेला निर्णय अंतिम राहील.

**<u>(ई) ग्रंथालय अनुदान योजना :-</u>**

१) **उद्दिष्टे :-** हिंदी भाषेची उन्नती करण्यासाठी हिंदी पुस्तकांच्या लिखाण व वाचनाची आवश्यकता आहे. हिंदी पुस्तकांच्या माध्यमातूनच हिंदी साहित्याचा प्रचार व प्रसार होणार असल्यामुळे या बाबीस प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथालयांना हिंदी पुस्तके खरेदी करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

२) **<u>अर्ज करण्यासाठी नियमावली :-</u>**

१ एप्रिल महिन्यात वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन ग्रंथालयांकडून हिंदी भाषेतील पुस्तके विकत घेण्यासाठी पुस्तकांची यादी मागविण्यात येईल.

२ पुस्तकांची यादी सादर करतांना त्यामध्ये पुस्तकाचे नांव, लेखकाचे नांव, साहित्य प्रकार, प्रकाशन संस्थेचे नांव, प्रकाशन वर्ष व पुस्तकाची किंमत इ. बाबतचे विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३ सदर अनुदान हे ग्रंथालयांना केवळ हिंदी भाषेतील पुस्तके विकत घेण्यासाठी मिळेल.

४ ग्रंथालयांना या अनुदानाचा उपयोग कार्यालयीन कामकाजासाठी करता येणार नाही. ग्रंथालयांना पुस्तकांसाठी अनुदान देताना त्यामध्ये नवलकथा, कविता, नाटक, निबंध, ललितकथा, विवेचन, चिंतन, साहित्यिक संपादन इ. वाड्.मय प्रकारांचा समावेश असावा. परंतु साहित्येतर पुस्तके उदा. पाककृती, वैद्यकीय अथवा शालेय अभ्यासक्रम, उद्योगधंदे वगैरेचा समावेश असलेल्या पुस्तकांच्या खरेदीस अनुदान देता येणार नाही.

५ अनुदानातून विकत घेण्यात आलेल्या पुस्तकांच्या पहिल्या व शेवटच्या पानांवर हिंदी भाषेमध्ये खालील मजकूर असलेला रबरस्टँप मारलेला असावा. " हे पुस्तक महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून विकत घेण्यात आले आहे. "

६ ज्या ग्रंथालयांना पुस्तक खरेदीसाठी अनुदान मिळाले आहे, अशा संस्थांनी पुस्तक विकत घेतल्यानंतर पुस्तकाच्या देयकाच्या झेरॉक्सप्रती सनदी लेखापालाच्या सहीशिक्क्यानिशी अकादमीस सादर केल्यानंतरच सदर ग्रंथालयास पुढील वर्षी अनुदानाची मागणी करता येईल.
७ ग्रंथालयांना अनुदान देण्यासंदर्भातील अकादमीचा निर्णय अंतिम राहिल.
८ या योजनेअंतर्गत अनुदानाची मागणी अमान्य करताना कोणतेही कारण दिले जाणार नाही.
९ जे पुस्तक विक्रेते अकादमीस १०% किंवा त्यापेक्षा जास्तीची सवलत तसेच ग्रंथालयांना द्वारपोच पुस्तके पुरवतील, अशा पुस्तक विक्रेत्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**३) <u>अनुदानाचे स्वरुप :-</u>** प्रत्येक वर्षी रु.२०,०००/- ते २५,०००/- पर्यंतच्या मूळ किंमतीच्या पुस्तक खरेदीसाठी अनुदान मंजूर करता येईल.

**१) पात्रता :-**

१ फक्त नोंदणीकृत संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयासच या योजनेचा लाभ मिळू शकेल.
२ खाजगी अथवा व्यावसायिक तत्वावर चालविण्यात येणारी ग्रंथालये या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.

**(उ) कार्यशाळा :-**

हिंदी भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहिता-वाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत दरवर्षी प्रुफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळेचे आणि पटकथालेखन, अनुवाद इत्यादी कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. दर वर्षी २ कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे. प्रत्येक कार्यशाळेसाठी रू. २.०० लाख इतक्या मर्यादेत खर्च करण्यात यावा. याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यशाळेचे आयोजन करावे.

**(ऊ) महिला साहित्य परिषद :-**

महिलांमध्ये हिंदी साहित्याबद्दलची जागृती निर्माण व्हावी, यासाठी अकादमीमार्फत महिला साहित्य परिषद आयोजित करण्यात यावी. यासाठी कमाल रु.२.०० लाख इतका खर्च करण्यात यावा व याबाबतच्या खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

**(ए) हिंदी अकादमीचा अभ्यास दौरा :-**

ज्या राज्यांमध्ये हिंदी अकादमी आहे, त्यांचे कामकाज व उपक्रम पाहून आपल्या अकादमीसाठी त्याचा कसा उपयोग होऊ शकेल, याचा आढावा घेण्यासाठी अकादमीच्या ४ ते ५ समिती सदस्यांचा समावेश असलेल्या अभ्यास गटास त्या राज्यामध्ये दौऱ्याचे आयोजन करता येईल. तथापि, यासाठी शासनाची पूर्व संमती घेणे आवश्यक राहील.

**(ऐ) पत्रकारीतेशी संबंधित संगोष्ठी :-**

प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाशी संबंधित परिषदा आयोजित करण्यात याव्यात व या परिषदांसाठी एकूण रू. २.०० लाख इतका खर्च करण्यात यावा. या बाबतच्या

खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**(ओ) <u>पत्रिका खरेदी :-</u>**

हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी हिंदी भाषेच्या महत्त्वपूर्ण पत्रिका अकादमीतर्फे खरेदी करून ग्रंथालय, हिंदी साहित्यिक, पत्रकार, हिंदी साहित्य क्षेत्रातील विद्वान, अकादमी सदस्य यांना पाठविण्यात याव्यात. हिंदी भाषेतील पत्रिका खरेदीबाबतचा निर्णय समिती सदस्य घेतील. पत्रिका खरेदी रू. ३.०० लाख इतक्या वार्षिक खर्चाच्या मर्यादेत करण्यात यावी.

हिंदी साहित्य अकादमीच्या उपर्निर्दिष्ट योजनांवरील खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, (०८) हिंदी अकादमी, (०८) (०१) हिंदी अकादमीची आस्थापना, (२२०५ १६८८) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षातून त्या त्या वर्षी मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in व विभागाच्या www.cultural.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१८१०४९११६१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae114 57103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b9 8e926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.25 12:32:41 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष व अशासकीय सदस्य (सहसंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्यामार्फत)
६. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय (माहिती / वृत्त), मंत्रालय, मुंबई
९. सहसंचालक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई

१०.महालेखापाल - १, (लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. महालेखापाल - १, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. महालेखापाल - २, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३. महालेखापाल - २, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४

**महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमेत वाढ करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२४/प्र.क्र.२५७/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २४ सप्टेंबर, २०२४**

**वाचा :** शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. हिंसाअ ७०१९ (१४)/ प्र.क्र.१८८/सां.का.४, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९.

**प्रस्तावना :-**

हिंदी भाषेच्या प्रसार-प्रचारासाठी तसेच, हिंदी साहित्याच्या सर्वांगीण उन्नती व विकासासाठी महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी स्थापन करण्यात आलेली आहे. विभागाच्या उपर्निर्दिष्ट शासन निर्णयान्वये हिंदी साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सदर पुरस्कार रकमेत दुपटीने वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

हिंदी साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. हिंदी अकादमीमार्फत देण्यात येणाऱ्या खालील पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्काराची सध्याची रक्कम | पुरस्काराची प्रस्तावित रक्कम |
|---|---|---|---|
| **अखिल भारतीय सन्मान जीवन गौरव पुरस्कार** | | | |
| १) | महाराष्ट्र भारती अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार | रु.१,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| २) | डॉ. राम मनोहर त्रिपाठी अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार | रु.१,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| **राज्यस्तरीय सन्मान जीवन गौरव पुरस्कार** | | | |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय एकता पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ४) | साने गुरुजी राष्ट्रीय एकता पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ५) | पद्मश्री अनंत गोपाल शेवडे हिंदी सेवा पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ६) | डॉ.उषा मेहता हिंदी सेवा पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ७) | गजानन माधव मुक्तिबोध मराठी भाषी हिंदी लेखक पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | कांतिलाल जोशी इतर हिंदी भाषी हिंदी लेखक पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| ९) | व्ही.शांताराम ललित कला हिंदी विशिष्ट सेवा पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| १०) | सुब्रमण्य भारती हिंदी सेतु विशिष्ट सेवा पुरस्कार | रु. ५१,०००/- | रु. १,००,०००/- |
| | **विधा पुरस्कार** | | |
| १) | संत नामदेव पुरस्कार - (काव्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| २) | जैनेंद्र कुमार पुरस्कार - (उपन्यास) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ३) | मुंशी प्रेमचंद पुरस्कार - (कहानी) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ४) | आचार्य रामचंद्र शुक्ल पुरस्कार - (निबंध) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ५) | आचार्य नंददुलारे वाजपेयी पुरस्कार - (समीक्षा) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ६) | मामा वरेरकर पुरस्कार - (अनुवाद) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ७) | होमी जहांगीर भाभा पुरस्कार - (वैज्ञानिक तकनीकी) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ८) | पं.महावीर प्रसाद द्विवेदी पुरस्कार - (हिंदी भाषा संबंधी लेखन) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ९) | विष्णूदास भावे पुरस्कार - (नाटक) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| १०) | काका कालेलकर पुरस्कार - (जीवनी परक साहित्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| ११) | बाबुराव विष्णू पराडकार पुरस्कार - (पत्रकारीता) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| १२) | सोहनलाल द्विवेदी पुरस्कार - | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | (बालसाहित्य) | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| १३) | फणीश्वरनाथ रेणू पुरस्कार - (लोकसाहित्य) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |
| १४) | शशिभूषण वाजपेयी हिंदी लेखक पुरस्कार (राष्ट्रभक्ती पर आधारित लेखन) | स्वर्ण-रु.३५,०००/- | स्वर्ण-रु.७५,०००/- |
| | | रजत-रु.२५,०००/- | रजत-रु.५०,०००/- |
| | | कांस्य-रु.११,०००/- | कांस्य-रु.२५,०००/- |

०२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपर्निर्दिष्ट दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व बाबी यथास्थिती लागू राहतील. तसेच, सदर शासन निर्णय ज्या दिनांकास निर्गमित होईल त्या दिनांकापासून सदरचा निर्णय अंमलात येईल.

०३. या प्रित्यर्थ होणारा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, (००), १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०८) हिंदी साहित्य अकादमी, (०८) (०१) हिंदी अकादमीची आस्थापना (कार्यक्रम), (२२०५ १६८८) ०५ बक्षिसे या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षाच्या अर्थसंकल्पित निधीतून भागविण्यात यावा.

०४. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. यासाठी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२४/ प्र.क्र.८०/ अर्थ-३, दिनांक २५ जुलै, २०२४ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५०८१४१९१७०८२०१९१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( गोपिचंद पांडुरंग चव्हाण )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.

३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई
५. निवड समितीचे सर्व अशासकीय सदस्य (सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांचे मार्फत)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र, नागपूर
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र, नागपूर
१३. कक्ष अधिकारी (अर्थसं.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१४. निवड नस्ती, सां.का.४